"येथे बहुतांचे हित"

# मराठवाडा मित्र मंडळाचे
# शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित आणि **NAAC** द्वारे **'अ'** श्रेणी प्रमाणित)

## आंतरविद्या अभ्यासकेंद्र

आयोजित करीत आहे

# जिज्ञासा २०२२

## महाभारत आणि कायदा : सेतू अभ्यासक्रम

(महाभारत प्रवचनमाला व संकलित साहित्यकृती)

**०५ सप्टेंबर ते ०८ सप्टेंबर २०२२**

**प्रवचनकार**

**आदरणीय मकरंद रामदासी**



स्थळ :
मराठवाडा मित्र मंडळाचे
शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे



महाभारत प्रवचने मराठीमध्ये होतील आणि संकलित साहित्यकृती इंग्रजीमध्ये प्रकाशित केली जाईल.

**Mahabharata narration will be in local language-Marathi and edited book will be published in English Language.**

## मराठवाडा मित्र मंडळ व शंकरराव चव्हाण महाविद्यालयाबद्दल...

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणेतून १९६७ साली मराठवाडा मित्र मंडळाची धर्मादाय संस्था म्हणून स्थापना करण्यात आली. येथे 'बहुतांचे हित' या ब्रीदवाक्यानुसार आम्ही सेवा देत आहोत. मराठवाडा मित्र मंडळाच्या विविध शैक्षणिक संस्थांमधून आर्किटेक्चर, मॅनेजमेंट, लॉ, कॉमर्स, फार्मसी आणि इंजिनीअरिंग इत्यादी विषयांच्या उत्कृष्ट सुविधा पुरविल्या जातात आणि १२००० हून अधिक विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत.

मराठवाडा मित्र मंडळाच्या आश्रयाखाली; विधी व्यावसायिक आणि संशोधकांना आदर्श समाज घडवता यावा या उद्देशाने शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालयाची स्थापना २००३ साली करण्यात आली. हे महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असून बार कौन्सिल ऑफ इंडिया व महाराष्ट्र सरकारकडून मान्यताप्राप्त आहे. **NAAC** द्वारे **'A'** श्रेणीने मान्यता दिली आहे. भारतातील प्रमुख विधी महाविद्यालयांपैकी एक म्हणून महाविद्यालयाची ओळख आहे. 'समाजासाठीसाठी दर्जेदार कायदेशीर शिक्षण' या तत्त्वानुसार महाविद्यालय आपली भूमिका पार पाडते आहे. शैक्षणिक उत्कृष्टतेव्यतिरिक्त, आम्ही अनेक सह-अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमेतर उपक्रमांमधून विद्यार्थ्यांची जडणघडण करतो.

## आंतरविद्या अभ्यासकेंद्राविषयी...

कायदा ही एक गतिशील संकल्पना असून त्याचा ज्ञानाच्या इतर शाखांशी संबंध आहे. समकालीन दृष्टिकोनातून, इतर सामाजिक विषयांसह आज कायद्याची संकल्पना समजून घेणे महत्त्वपूर्ण झाले आहे. म्हणून, आंतरविद्याशाखीय; बहुशाखीय संशोधनाला शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याच तत्त्वावर भर देते. याच पार्श्वभूमीवर आंतरविद्या अभ्यासकेंद्र म्हणजेच **Centre for Interdisciplinary Studies (CIDS)** कायदा आणि इतर विषयांमधील संबंधांवर अभ्यास करणारे केंद्र आहे. कायदा आणि इतर विषयांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करणे आणि समजून घेणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

## 'जिज्ञासा' विषयी...

सध्याची कायदेशीर व्यवस्था ही मुख्यत: अभारतीय विचारवंतांनी मांडलेल्या तत्त्वांवर आणि संस्थांवर आधारित आहे. त्यामुळे आपल्याला आपल्या मूळ कायदेशीर व्यवस्थेपासून दूर केले आहे. अलिकडच्या वर्षांत पाश्चिमात्य कायदा-विचारवंत-न्यायशास्त्र-कायदेशीर शिक्षण आणि पाश्चिमात्य कायदेशीर साहित्य इत्यादींमुळे आम्हाला केवळ पाश्चिमात्य दृष्टीकोनातून कायदा समजण्यास व विचार करण्यास प्रवृत्त केले. आम्ही भारतीय कायदेशीर व्यवस्था भेदभावपूर्ण, तर्कहीन, दंडात्मक, पक्षपाती, अराजक म्हणून पाहतो.
त्यामुळे भारतीय कायदेशीर क्षेत्रात संशोधन आणि शिक्षण मोठ्या प्रमाणावर मर्यादित झाले. म्हणूनच आंतरविद्या अभ्यासकेंद्र नाविन्यपूर्ण मार्गाने भारतीय पारंपारिक ज्ञानाचा शोध घेण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि त्यासाठीच जिज्ञासा २०२२ ही संकल्पना आहे. भारतातील तरुण पिढीमध्ये भारतीय संस्कृती आणि मूल्ये रुजवून भारतीय न्यायशास्त्र समजून घेणे हाच 'जिज्ञासा'चा मूळ उद्देश आहे. तसेच, समकालीन युगात भारतीय न्यायशास्त्रावरील संशोधनाला चालना देणे हे उद्दिष्ट आहे.

भारुड, प्रवचन, कीर्तन हे समाज प्रबोधनाची प्रभावी माध्यमे होती आणि म्हणूनच ही माध्यमे महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहेत. तंत्रज्ञानातील विकास आणि सोशल मीडियाच्या उदयानंतरही ही माध्यमे तरुण पिढीमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मूल्ये रुजवण्यासाठी आजही तितकीच प्रभावी आहेत. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जतन करणे हे 'जिज्ञासा'चे वैशिष्ट्य आहे. 'जिज्ञासा' म्हणजे उच्चशिक्षण क्षेत्रातील एक नाविन्यपूर्ण प्रयोग असून याचा भाग होणारी प्रत्येक व्यक्ती संस्कृतीच्या माध्यमातून शिक्षण घेईल. त्याचप्रमाणे वरील उल्लेखानुसार ज्या काळात भारुड, प्रवचन इ. समाज प्रबोधन माध्यमे प्रचलित होती त्या काळाची प्रचीती आजच्या पिढीला काही प्रमाणात का असेना अनुभवता येईल....

## 'जिज्ञासा २०२२' चा विषय...

जिज्ञासा २०२२ चा विषय महाभारत आणि कायदा आहे. महाभारत हा अद्वितीय ग्रंथ आहे आणि याचे कारण असे की यातील सर्व व्यक्तिरेखा या सामान्य माणसाप्रमाणे आहेत. म्हणूनच त्यातील प्रत्येक व्यक्तीरेखेचे वेगळे गुण-दोष आहेत. त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात नैतिक अडचणी आणि निवडींचा सतत सामना करावा लागतो. त्यामुळे सध्याच्या काळात महाभारत अत्यंत मौल्यवान आणि महत्त्वाचे आहे. महाभारत कायदा आणि सामाजिक समस्यांबद्दल अनेक धडे शिकवते. नैतिकता, शांतता, युद्ध, राजनैतिक संबंध, राज्याचे संरक्षण, सार्वभौमत्व अश्या अनेक विषयांमध्ये महाभारतामध्ये विस्तृत विवेचन आहे. म्हणून, आजच्या सामाजिक न्याय आणि नीतीमूल्यांच्या अभ्यासाच्या अनुषंगाने महाभारत या ग्रंथाला शैक्षणिक क्षेत्रात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

धृतराष्ट्राचा मंत्री 'कणिक' हा महाभारतातील एक नेता आहे. 'कणिकनीती' मध्ये असलेल्या वर्णनानुसार राज्यव्यवस्थेच्या आणीबाणीच्या काळातील नियम आजही मार्गदर्शक आहेत. 'विदुर' हा कुरु राज्याचा पंतप्रधान म्हणून ओळखला जात असे. ते पांडव आणि कौरवांचे मामा आहेत. पांडव आणि कौरवांमधील युद्धानंतर, धृतराष्ट्राने विदुरांसमवेत केलेली चर्चा महत्त्वपूर्ण मानली जाते आणि त्याचे वर्णन 'विदुरनीती'मध्ये केले आहे. विदुरनीतीमधील मूल्ये राज्यशास्त्र, राज्य प्रशासन आणि कायद्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आहेत. याशिवाय कौरव आणि पांडव यांच्यातील युद्धात श्रीकृष्णाने अर्जुनाला खूप महत्त्वाचे संदेश दिले आहेत ज्याचा 'कृष्णनीति' अंतर्गत विचार केला जाऊ शकतो.

*म्हणून जिज्ञासा-२०२२ साठीचे उपविषय खालीलप्रमाणे आहेत:*

**महाभारताचा परिचय, कणिकनीती, विदुरनीती आणि कृष्णनीती.....**

## प्रवचनकार स.भ. मकरंद रामदासी यांच्याविषयी....

* प्रख्यात प्रवचनकार तसेच कीर्तनकार...१२ वर्षांच्या सज्जनगडावरील सेवाकाळात कीर्तन-प्रवचानाबरोबरच तबला, संवादिनी, वेद आणि वेदांताचे अध्ययन...समर्थ रामदासांच्या साहित्याचा विशेष अभ्यास...

* गुरु: स. भ. श्री. शेंबेकर बुवा, श्री. करमरकर बुवा, श्री. दत्तादास बुवा घाग, श्री विद्याशंकर भारती, स्वामी वरदानंद भारती, पूजनीय बाबा बेलसरे, सध्या प. पु. डॉक्टर देशमुख काका प. आ. मंदाताई गंधे यांचेकडे पुढील अध्ययन...

* कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठातून सुवर्ण पदक व प्रथम क्रमांक मिळवत संस्कृत विषयाची पदवी संपादन.

* या व्यतिरिक्त Diploma In Mechanical Engineering आहेत, तसेच वैमानिकाचे प्रशिक्षण घेतले आहे.

* भारतात महाराष्ट्र (सर्व जिल्हे), गोवा, कर्नाटक, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, पंजाब, आंध्रप्रदेश व गुजरात तसेच भारताबाहेर सिंगापूर, स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रांस , दुबई इत्यादी ठिकाणी परदेशात मिळून पाच हजार पेक्षा जास्ती कीर्तने आणि प्रवचने झाली आहेत.

* श्री नारद मंदीर पुणे; श्री. भद्रकाली मंदीर संस्थान, नाशिक; श्री. सिद्धिविनायक मंदीर कोल्हापुर; सूर संवर्धन संस्था, पुणे इ. संस्थांचे अनेक पुरस्कार प्राप्त.

**प्रवचनमालेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणी आवश्यक...!!**
**सहभाग नावनोंदणी आणि संकलित साहित्यकृती मध्ये लेखक म्हणून सहभागी होण्यासाठीची माहिती खालीलप्रमाणे...!!!**

## Call for Chapters in edited book on

# "Mahabharata and Law"

The organizers invite original, unpublished chapters for edited book on Bridging Mahabharata and Social Sciences from students, research scholars, academicians and professionals of various faculties on the themes of Jidnyasa 2022. Researcher is expected to conduct research on main theme or other themes and its nexus with social sciences like law, sociology, economics, political science, state administration etc. The interested researcher should send an abstract of not exceeding 300 words accompanied by a brief profile of the author/s including Name, Designation, Institutional Affiliation, Contact details, and email ID.

**Link for Mahabharata Manuscript with English Translation:**

https://drive.google.com/file/d/1sT93LU2qfPVLuAwEoGrOsMNaOqPHoAq9/view?usp=sharing

## Guidelines for Paper Submission

| | |
|---|---|
| **Font** | **Times New Roman** |
| **Font Size** | **12 (for Footnotes – 10)** |
| **Word Limit** | **3000 – 5000 words (including footnotes)** |
| **Line Spacing** | **1.5 (for Footnotes 1.0)** |
| **Citation Method** | **The Bluebook Style of Citation, 20th Edition** |
| **Language** | **English only** |

**Authorship may be extended maximum up to two authors**

· In accordance with the double-blind process of review, the name of the author/s and their institutional affiliation must not be mentioned or indicated anywhere in main body of the manuscript.

**Submissions shall be through E-mail only & all correspondences and queries may be addressed to :**
**cids@sclc.edu.in**

## Important Dates

| | |
|---|---|
| Last Date for Submission of Abstract | 24th September 2022 |
| Notification of Selection of Abstract5 working days after the submission of Abstract | 5 working days after the submission of Abstract |
| Last Date for Submission of Full Paper | 29th October 2022 |
| Last Date for Registration | 30th August 2022 |

## Fee Details

| | |
|---|---|
| Participation (for Students) | Rs. 350 |
| Participation (for Research Scholars, Professionals etc.) | Rs. 650 |
| Participation and Contribution as Author (for Students) | Rs. 450 |
| Participation and Contribution as Author (for Research Scholars, Professionals etc.) | Rs. 950 |
| Participation/ Contribution as Author Students of Marathwada Mitra Mandal | Rs. 250 |

**Link for Registration form is : https://forms.gle/t1y7Ap5RZgfTSgZE8**

The Registration fee includes entry for **Jidnyasa 2022** and high tea as refreshment for 04 days of activity.

The registration fees (contribution as Author) includes entry for Jidnyasa 2022 and high tea as refreshment for 04 days of activity, hard copy of edited book and certificate for contribution as Author.

**Jidnyasa - 2022** will be Bilingual course in which sessions will be conducted in Marathi and chapters of edited book will be in English.

**Timing for all 04 days : 12.30 pm to 04.30 pm**

**Venue : MM Shankarrao Chavan Law College, Pune.**

**Fee Remittance Details (For NEFT)-**
Name- MMMS Shankarrao Chavan Law College
A/c. No.- 50100106697534
Bank Name- HDFC Bank
Branch- Mayur Colony, Pune.
IFSC – HDFC0000149

# CONVENORS

**Prin. Mr. B. G. Jadhav**
Executive Director,
Marathwada Mitra Mandal,
Pune, Maharashtra, India

**Dr. Kranti Deshmukh**
Principal,
MM Shankarrao Chavan Law College,
Pune, Maharashtra, India

**Dr. Pratik Salgar**
Programme Officer
+91 942 026 2720

For any query contact : **cids@sclc.edu.in**